# तिसरे शासकीय अधिकारी मराठी साहित्य संमेलन २०२६
# शासकीय अधिकारी-कर्मचारी ग्रंथपुरस्कार

**प्रस्तावना**

शासकीय सेवेत कार्यरत असलेल्या लेखक, साहित्यिक व कवी यांच्या सृजनशीलतेला व्यासपीठ मिळावे, त्यांच्या साहित्यिक लेखनाचा प्रसार व्हावा तसेच शासकीय अधिकाऱ्यांमध्ये साहित्यविषयक संवाद व चर्चा घडून येऊन साहित्यिक वातावरणाची निर्मिती व्हावी, या उदात्त हेतूने मागील दोन वर्षांपासून शासकीय अधिकारी मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात येत आहे.

पुणे महानगरपालिका व संवाद पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सन २०२४ मध्ये पहिले राज्यस्तरीय शासकीय अधिकारी मराठी साहित्य संमेलन बालगंधर्व रंगमंदिर येथे दिनांक २१ व २२ डिसेंबर २०२४ रोजी यशस्वीरित्या संपन्न झाले. दुसरे राज्यस्तरीय शासकीय अधिकारी मराठी साहित्य संमेलन दिनांक २१ व २२ फेब्रुवारी २०२६ रोजी पुणे महानगरपालिका, यशदा पुणे  व संवाद पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्याचे आले. तिसरे राज्यस्तरीय शासकीय अधिकारी मराठी साहित्य संमेलन दिनांक २८ व २९ नोव्हेंबर २०२६ रोजी पुणे महानगरपालिकेचा मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था, राष्ट्रीय पुस्तक न्यास नवी दिल्ली, यशदा पुणे व संवाद पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्याचे नियोजित आहे.

तिसऱ्या शासकीय अधिकारी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून मा. प्रविणसिंह परदेशी महाराष्ट्राच्या मा. मुख्यमंत्री यांचे मुख्य आर्थिक सल्लागार यांची निवड करण्यात आली आहे. तर मा. डॉ. नवलकिशोर राम, महापालिका आयुक्त पुणे महानगरपालिका यांची स्वागताध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली आहे. डॉ. सुहास दिवसे महासंचालक यशदा यांची संयोजक म्हणून निवड करण्यात आली आहे. सह संयोजक म्हणून मा. योगेश सोमण महाराष्ट्र साहित्य परिषद व मा. राजेश पांडे, राष्ट्रीय पुस्तक न्यास नवी दिल्ली यांची निवड करण्यात आली आहे.

सदर संमेलन हे दिनांक २८ व २९  नोव्हेंबर २०२६ रोजी होणार असून या संमेलनात कलादालन बालगंधर्व रंगमंदिर येथे अधिकाऱ्याचे पुस्तक प्रकाशन, पुस्तक प्रदर्शन व छायाचित्र प्रकाशन होणार आहे. तसेच हे दिनांक २८ व २९ नोव्हेंबर २०२६ रोजी संमेलनात एकूण बारा सत्र नियोजित आहेत.

मागील वर्षीपासून विविध वाङ्मय प्रकारात शासकीय अधिकारी-कर्मचारी यांनी लिहिलेल्या साहित्यकृतींना ग्रंथपुरस्कार देऊन गौरविण्यात येते. या वर्षीही तिसऱ्या शासकीय अधिकारी मराठी साहित्य संमेलनात विविध साहित्यकृतींना ग्रंथपुरस्कार देऊन पुरस्कृत करण्यात येणार आहे.

**पुरस्कारासाठी नामांकने पाठविण्यासाठी सविस्तर माहिती खालीलप्रमाणे -**

## १. पुरस्कारासाठी पात्रता

- शासकीय अधिकारी-कर्मचारी ग्रंथ पुरस्काराकरिता नामांकन पाठविण्यासाठी शासकीय सेवेत कार्यरत असलेले किंवा शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेले सर्व संवर्गातील अधिकारी-कर्मचारी पात्र असतील.

## २. तांत्रिक बाबी

- या पुरस्कारासाठी केवळ अभिजात साहित्य स्वीकारले जाईल. संकलित / संपादित / अनुवादित साहित्य स्वीकारले जाणार नाही.
- शासकीय अधिकारी-कर्मचारी ग्रंथ पुरस्काराकरिता नामांकन पाठविण्यासाठी केवळ मराठी भाषेतील पुस्तके स्वीकारली जातील. इतर कोणत्याही भाषेतील पुस्तके स्वीकारली जाणार नाहीत.
- पुरस्कारासाठी १ जानेवारी २०२६ ते ३० ऑक्टोबर २०२६ दरम्यान प्रकाशित झालेली पुस्तके स्वीकारली जातील. त्या आधी किंवा त्यानंतर प्रकाशित झालेली पुस्तके स्वीकारली जाणार नाहीत.
- पुरस्कारासाठी पुस्तकाची केवळ पहिली आवृत्ती स्वीकारली जाईल. दुसरी किंवा त्यानंतरची कोणतीही आवृत्ती पुरस्कारासाठी विचारात घेतली जाणार नाही.
- पुस्तकात मूल्य / प्रकाशक / लेखक / आयएसबीएन क्रमांक किंवा आवृत्तीच्या माहितीचे स्टीकर लावलेले पुस्तके पुरस्कारासाठी ग्राह्य धरली जाणार नाहीत.
- पुरस्कारासाठी केवळ मुद्रित माध्यमातून प्रकाशित झालेली पुस्तके स्वीकारली जातील. पुस्तकाचा कच्चा मसुदा, प्रकाशनपूर्व मसुदा स्वीकारला जाणार नाही.

- कोणत्याही प्रकारे मुद्रित माध्यमांशिवाय इतर कोणत्याही जसे की ऑडिओ बुक किंवा ई-बुक किंवा किंडल बुक स्वरुपात प्रकाशित पुस्तके नामांकनासाठी स्वीकारले जाणार नाहीत.
- पुरस्कारासाठी पुस्तके पाठवताना सोबत दिलेला नामांकन अर्ज प्रिंट करून त्यावर व्यवस्थित सर्व माहिती लिहून नामांकन पाठवावीत.
- पुरस्कारासाठी नामांकने ही लेखकाने स्वत: किंवा लेखकांच्या परवानगीने प्रकाशकांनी पाठविणे आवश्यक आहे. इतर कोणत्याही माध्यमातून आलेली नामांकने स्वीकारली जाणार नाहीत.
- काव्यसंग्रह (६४ पाने) वगळता इतर कोणत्याही प्रकारचे साहित्य हे किमान १०० किंवा त्याहून अधिक पानांचे असणे अपेक्षित.
- नामांकनासाठी पाठविलेल्या पुस्तकाबाबत पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर स्वामित्व हक्क किंवा तत्सम इतर कोणताही वाद झाल्यास त्यास सर्वस्वी लेखक जबाबदार असेल. त्यासाठी शासकीय अधिकारी कर्मचारी पुरस्कार निवड समिती जबाबदार असणार नाही.
- एकाच लेखकाची एकाहून अधिक साहित्यप्रकारातील पुस्तके असल्यास विविध साहित्यप्रकारात नामांकन दाखल करता येतील.
- पुरस्कार निवड समितीने घेतलेला निर्णय सर्वांना बंधनकारक असेल.

## ३. विषय व गुणवत्ता निकष

- पुरस्कारासाठी पाठविण्यात येणारे पुस्तकाचे लेखक / कवी हे केवळ एकच असणे अपेक्षित आहे. एकापेक्षा अधिक लेखक किंवा कवी असल्यास असे पुस्तक पुरस्काराच्या नामांकनासाठी अपात्र ठरेल.
- साहित्य **सामाजिक, शैक्षणिक, प्रशासकीय किंवा सांस्कृतिक मूल्ये वाढवणारे** असावे.
- पुस्तकात कोणतेही **भडक, द्वेषमूलक, आक्षेपार्ह** किंवा असत्य माहिती नसावी.
- पुरस्कारासाठी सादर करण्यात आलेल्या पुस्तकामध्ये भाषेची शुद्धता, आशयाची मौलिकता व माहितीची विश्वसनीयता आवश्यक आहे.

## ४. साहित्यप्रकार व इतर सविस्तर बाबी
## (खालील प्रत्येक साहित्यप्रकारात एक पुरस्कार दिला जाईल)

| क्र. | साहित्य प्रकार |
|---|---|
| १. | कादंबरी |
| २. | कथासंग्रह |
| ३. | काव्यसंग्रह |
| ४. | ललित लेख / चिंतनपर लेख / निबंध / लेख संग्रह |
| ५. | आत्मचरित्र / चरित्र / व्यक्तीचित्रण / आत्मकथन |
| ६. | नाटक (दीर्घांक, एकांकिका इत्यादी) |
| ७. | संशोधनात्मक लेखन (शोधनिबंध / लोकसाहित्य / लोककलांसह इतर कोणत्याही विषयावरील संशोधन) / वैज्ञानिक / शैक्षणिक |
| ८. | प्रवासवर्णन |
| ९. | उपेक्षितांचे साहित्य |
| १०. | प्रशासकीय लेखन |
| ११. | बालसाहित्य (बालकथा, बालकविता, बालनाट्य इ. बालसाहित्य) |
| १२. | तांत्रिक विषयावर किंवा विषयविशिष्ट साहित्य |

### ५. पुरस्काराचे स्वरुप

प्रत्येक संवर्गात तीन पुरस्कार देण्यात येणार असून पुरस्कारार्थी अधिकाऱ्यांना स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

## ६. अर्ज करण्याची पद्धत

पुरस्कारासाठी पुस्तकाच्या दोन प्रती आणि या माहितीपत्रकासोबत जोडलेल्या जोडलेल्या अर्जाची प्रिंट काढून खालील पत्त्यावर पाठवावेत. अर्जाशिवाय प्राप्त झालेली पुस्तके स्वीकारली जाणार नाहीत. कोणत्याही प्रकारे ऑनलाईन अर्ज किंवा इतर कोणत्याही माध्यमातून आलेले अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत. पुरस्कारासाठी प्राप्त झालेली पुस्तके कोणत्याही परिस्थितीत परत पाठविली जाणार नाहीत. ही पुस्तके यशदा ग्रंथालयाचा भाग असतील.

**अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख : १ नोव्हेंबर २०२६**

## ७. पुरस्कारासाठी अर्ज सादर करण्यासाठीचा पत्ता

व्यंकटेश कल्याणकर
माध्यम व प्रकाशन केंद्र, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी,
बाणेर रस्ता, यशदा, पुणे 411 007
मो. 77987 03952

**वर दिलेल्या माहिती व्यतिरिक्त काही माहिती हवी असल्यास कृपया व्यंकटेश कल्याणकर, प्रकल्प संशोधक, माध्यम व प्रकाशन विभाग, यशदा, पुणे (मो. 7798703952) यांना कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत संपर्क करावा. पुरस्कार निवड समितीचा निर्णय अंतिम असेल. वरील नियमांत बदल करण्याचा अधिकार समितीने स्वत:कडे राखून ठेवला आहे.**

| **व्यंकटेश कल्याणकर** | **डॉ. किरण धांडे** | **सुनिल महाजन** | **राजीव नंदकर** | **शेखर गायकवाड** |
|---|---|---|---|---|
| पुरस्कार निवड समिती समन्वयक | पुरस्कार निवड समिती सदस्य | संमेलन निमंत्रक तथा सदस्य | संमेलन समन्वयक | निवड समिती अध्यक्ष |

# शासकीय अधिकारी कर्मचारी ग्रंथ पुरस्काराकरिता नामांकन अर्ज

अर्जातील सर्व माहिती भरणे आवश्यक I लागू असलेल्या बाबींवर ✓ अशी खूण करावी

पुरस्कारासाठी पाठविण्यात येणाऱ्या प्रत्येक पुस्तकासाठी स्वतंत्र अर्ज भरणे आवश्यक

| | | |
|---|---|---|
| **नाव**<br>(नाव, वडिलांचे / पतीचे नाव / आडनाव) | छायाचित्र जोडावे | |
| **लिंग** | स्त्री ☐ पुरुष ☐ | |
| **जन्म तारीख** | | |
| **शासन सेवेतील पद**<br>(निवृत्त असल्यास निवृत्तीवेळचे पद) | | |
| **संपर्क क्रमांक** (व्हॉटसॲपचा क्रमांक वेगळा असल्यास तो क्रमांकही नमूद करावा.) | संपर्क क्रमांक | |
| | व्हॉटसॲप क्रमांक | |
| **ई-मेल आयडी** | | |
| **शासनाचा विभाग / आस्थापना**<br>(निवृत्त असल्यास निवृत्तीवेळची आस्थापना) | | |
| **कायमचा पत्ता**<br>(शहर, तालुका, गाव) | | |
| **सध्या नियुक्त असलेला पत्ता** | | |

| | | |
|---|---|---|
| **नामांकन केलेल्या पुस्तकाचा प्रकार** (एकाच लेखकाच्या एकापेक्षा अधिक पुस्तकांचे नामांकन करत असल्यास प्रत्येक पुस्तकासाठी स्वतंत्र अर्ज भरावा.) | कादंबरी | ☐ |
| | कथासंग्रह | ☐ |
| | काव्यसंग्रह | ☐ |
| | ललित लेख / चिंतनपर लेख / निबंध / लेख संग्रह | ☐ |
| | आत्मचरित्र / चरित्र / व्यक्तीचित्रण / आत्मकथन | ☐ |
| | नाटक (दीर्घांक, एकांकिका इत्यादी) | ☐ |
| | संशोधनात्मक लेखन (शोधनिबंध / लोकसाहित्य / लोककलांसह इतर कोणत्याही विषयावरील संशोधन) | ☐ |
| | प्रवासवर्णन | ☐ |
| | उपेक्षितांचे साहित्य | ☐ |
| | प्रशासकीय माहितीपर | ☐ |
| | बालसाहित्य (बालकथा, बालकविता, बालनाट्य इ. बालसाहित्य) | ☐ |
| | तांत्रिक विषयावर किंवा विषयविशिष्ट साहित्य | ☐ |
| पुस्तकाविषयी थोडक्यात (२५० शब्द) (स्वतंत्र कागदावर लिहून सोबत जोडावे) | | |

या पुरस्कारासाठी असलेल्या नियम आणि अटी मी स्वत: वाचलेल्या आहेत. त्या मला मान्य आहेत. पुरस्कार समितीचा निर्णय अंतिम असणार आहे. धन्यवाद!

दिनांक :

ठिकाण : अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी